| | | | | |
|---|---|---|---|---|
| दाखल दिनांक | : | २०.१२.२०२४ | | |
| नोंदणी दिनांक | : | २०.१२.२०२४ | | |
| निकाल दिनांक | : | ०३.०८.२०२६ | | |
| कालावधी | : | वर्षे | महिने | दिवस |
| | | ०१ | ०७ | १४ |
| CNR No. MHCH070018502024 | | | | |

**सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), भद्रावती, जि. चंद्रपूर यांच्या न्यायालयात.**

(पिठासीन अधिकारी: ए.आर. देवरे)

**नियमित दिवाणी दावा क्र. ९२/२०२४** **निशाणी क्र.१३**

चंद्रशेखर कंचन शेट्टी,
वय – ५५ वर्षे, धंदा– नौकरी,
राह. भंगाराम वॉर्ड, हनुमान मंदिर जवळ,
ता. भद्रावती, जि. चंद्रपूर.

..... **वादी**

**विरूध्द**

जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी/मुख्याधिकारी,
नगर परिषद भद्रावती,
ता. भद्रावती, जि. चंद्रपूर.

..... **प्रतिवादी**

**दावा** : घोषणेकरिता कलम ३४ विशिष्ट मदत कायदा, १९६३.

---

वादीतर्फे :– श्री. आर. एस. सपकाळ, वि. विधीज्ञ.

प्रतिवादीतर्फे :– एकतर्फा

---

# न्यायनिर्णय

(जाहीर दिनांक ०३.०८.२०२६)

वादीने प्रस्तुतचा दावा हा कंचन पोनूस्वामी चेट्टी हे जीवंत नाही किंवा तो मयत असल्याबाबतचा ठराव होऊन मिळणेकरिता केलेला आहे.

०२. **वादीचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे:–**

वादी विवाहित असून त्याला पत्नी व मुले आहेत. ते सर्व एकत्र कुटूंबात चंद्रशेखर कंचन शेट्टी यांचेसह राहत असतांना वादीचे वडील नामे कंचन पोनुस्वामी चेट्टी हे मानसीक आजाराने ग्रस्त असतांना अचानक दिनांक १७.११.२०१७ रोजी सकाळी ०८.०० वाजताचे सुमारास काहीही माहिती न देता मौजा भंगाराव वार्ड, भद्रावती येथील घरून निघुन गेले. कंचन पोनुस्वामी चेट्टी यांचा शोध घेतला. परंतू ते मिळून आले नाही. शेवटी वादीची बहिण सौ. शांती देविदास कुमरे हिने पोलिस स्टेशन, भद्रावती येथे दिनांक १९.११.२०१७ रोजी तक्रार दाखल केली. पंरतू तरी देखील वादीचे वडीलांचा शोध घेवून मिळून आले नाही किंवा वादीचे वडील कुठे जीवंत असल्याबाबत ऐकायला सुध्दा आले नाही.

**०३.** वादीचे वडील हे मागील ०७ वर्षापेक्षा जास्त काळापासून बेपत्ता असून त्यांचेबाबत किंवा ते जीवंत असल्याबाबत कुणाकडुनही आतापर्यंत ऐकायला आलेले नाही. वादीचे वडील जेव्हा दिनांक १७.११.२०१७ रोजी घरून निघून गेले, त्यावेळी ते ७८ वर्ष वयाचे होते. प्रतिवादीस त्यांचे कार्यक्षेत्रातील जन्म/मृत्युची नोंद घेण्याची जबाबदारी व अधिकार असल्याने वादीने स्वतःकरीता काही शासकिय कामकाजाकरीता त्याच्या वडीलाचे

मृत्युबाबत नोंद घेण्यास व दाखला देण्यास लेखी विनंती केली असता प्रतिवादीने कायदेशिर क्षेत्राअभावी नोंद घेण्यास नकार दिला. त्यामुळे वादीस सदरचा दावा दाखल करावा लागत आहे.

**०४.** दाव्यास कारण जेव्हा वादीचे वडील घरून बेपत्ता झाले त्यावेळी पोलिस स्टेशन, भद्रावती येथे तक्रार देवून घडले असून, ज्यावेळी प्रतिवादीने वादीचे वडील मागील ०७ वर्षां पासून बेपत्ता असल्याने मृत्यु घटनेची नोंद घेण्यास नकार दिल्याने घडलेले आहे व दावा स्थळसीमेअंतर्गत सतत घडत आहे. वादीने अशा प्रकारचा दावा यापुर्वी अन्य कोणत्याही न्यायालयात दाखल केला नाही. सदरचा दावा प्रथमच दाखल करीत आहे.

**०५.** प्रतिवादीला दाव्याचे समन्स नि.क्र.६ प्रमाणे मिळून देखील ते प्रस्तुत दाव्यात हजर झाले नाही. त्यामुळे, प्रतिवादीविरुद्ध दि.२३.०९.२०२५ रोजी नि.क्र.१ वर दावा त्याच्याविरुद्ध दावा एकतर्फा चालविण्याचा आदेश पारित करण्यात आला.

**०६.** वादीच्या वकिलांचे युक्तिवाद ऐकले. दावा, अभिलेखावरील पुरावे व कागदपत्रांचे अवलोकन केले. त्याअनुषंगाने, खालीलप्रमाणे मुद्दे काढण्यात आले: –

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादीचे वडील श्री. कंचन पोनूस्वामी चेट्टी हे ०७ वर्षांपासून म्हणजेच दि.१७.११.२०१७ रोजी सकाळी ०८:०० वाजेपासून घर सोडून निघून गेले आहे किंवा बेपत्ता आहे, हे ती सिद्ध करते आहे काय? | **होकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| २. | वादी ही मागणी केल्याप्रमाणे श्री. कंचन पोनूस्वामी चेट्टी हे जीवंत नाही किंवा ते मयत झाले आहे हे जाहीर होऊन मिळण्याच्या अनुतोषास हक्कदार आहे काय? | **होकारार्थी** |
| ३. | आदेश व हुकूमनामा काय? | **दावा मंजूर करण्यात आला.** |

## कारणमिमांसा

०७. दाव्यातील कथनाचे पुष्ट्यर्थ वादीतर्फे साक्षीदार क्र.१ चंद्रशेखर कंचन शेट्टी (वा.सा.क्र.१) यांनी त्यांची साक्ष नि.क्र.०७ अन्वये नोंदविलेली आहे. तोंडी पुराव्या व्यतिरिक्त वादीने त्याच्या आधार कार्ड ओळखपत्राची प्रमाणित प्रत (नि.क्र.०८), कंचन पोनूस्वामी शेट्टी हे हरवल्याबाबत भद्रावती पोलिस ठाणे यांचे प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत (नि.क्र.०९), हरवलेल्या व्यक्तीचे जाहिरात प्रकाशित केलेल्या “चंद्रपूर नवभारत प्लस” ची प्रमाणित प्रत (नि.क्र.१०) आणि कंचन पोनूस्वामी शेट्टी यांच्या पॅन कार्डची प्रमाणित प्रत (नि.क्र.११) सादर करून नि.क्र.१२ वर पुरावा बंद पुरशीस दाखल केली आहे.

**मुद्दे क्र.१ व २ करिता–**

०८. वादींनी कंचन पोनूस्वामी चेट्टी हा जीवंत नाही किंवा तो मयत झाला आहे, असे ठरवून मिळणेबाबत दावा दाखल केलेला आहे. वादी चंद्रशेखर कंचन शेट्टी (वा.सा.क्र.१) यांनी त्याच्या सरतपासणीतील प्रतिज्ञापत्रात दाव्यात केलेल्या कथनाची पुनरावृत्ती केलेली आहे. वादीने कथन केल्याप्रमाणे वादी शासकीय कामकाजाकरिता कंचन पोनूस्वामी शेट्टी यांच्या

मृत्यूबाबत नोंद घेण्यास व दाखला देण्यास लेखी विनंती केली असता प्रतिवादीने कायदेशिर क्षेत्राअभावी नोंद घेण्यास नकार दिला. चंद्रशेखर शेट्टी (वा.सा.क्र.१) ह्याने त्याच्या कथनाला पुष्टी मिळण्याकरीता कंचन पोनूस्वामी शेट्टी हे हरवल्याबाबत भद्रावती पोलिस ठाणे यांचे प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत (नि.क्र.०९), हरवलेल्या व्यक्तीचे जाहिरात प्रकाशित केलेल्या "चंद्रपूर नवभारत प्लस" ची प्रमाणित प्रत (नि.क्र.१०) आणि कंचन पोनूस्वामी शेट्टी यांच्या पॅन कार्डची प्रमाणित प्रत (नि.क्र.११) दिले आहे. सदर कागदपत्रांचे अवलोकन केले असता सदर बाब दिसून येते.

**०९.** उपरोक्त नमूद पुराव्यावरून असे दिसून येते की, वादीने कथन केल्याप्रमाणे कंचन पोनूस्वामी चेट्टी हा दि.१७.११.२०१७ रोजी पासून घर सोडून गेल्यापासून परत आलेला नाही. तसेच, वादीने व त्याच्या नातेवाइकांनी त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला, परंतु तो मिळून आला नाही. तसेच, हरवलेल्या व्यक्तीचे जाहिरात प्रकाशित केलेल्या "चंद्रपूर नवभारत प्लस" ची प्रमाणित प्रत (नि.क्र.१०) देऊन कंचन पोनूस्वामी शेट्टी हा ०७ वर्षांपासून बेपत्ता असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे, असा निष्कर्ष काढता येईल की, जरी प्रतिवादी हे प्रस्तुत दाव्यात हजर झाले नाही तरी त्यांनी कंचन पोनूस्वामी शेट्टी हा ०७ वर्षांपासून बेपत्ता असल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे, वादीचे कथन हे संभाव्य आणि विश्वसनीय अभिप्रेत होते. सबब, वादीने भारतीय पुराव्याच्या कलम १०८ च्या तरतुदी प्रमाणे हे सिद्ध केले आहे की, त्यांनी कंचन पोनूस्वामी चेट्टी हा ०७ वर्षांहून अधिक काळापासून बेपत्ता असून त्याच्याबद्दल काहीही ऐकले नाही.

**१०.** सदर कागदपत्रांवरून असे दिसून येते की, कंचन पोनूस्वामी चेट्टी हे दिनांक १७.११.२०१७ रोजी घरातून निघून गेल्यानंतर आजपर्यंत त्यांचा कोणताही ठावठिकाणा लागलेला नाही. त्यांच्या नातेवाईकांनी व कुटुंबीयांनी त्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला असून त्याबाबत पोलीस ठाण्यात हरवल्याची तक्रारही नोंदविण्यात आली आहे. तसेच वर्तमानपत्रात जाहिरात प्रकाशित करूनही त्यांच्या बाबत कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही. प्रतिवादीला समन्स बजावूनही तो न्यायालयात हजर राहिला नाही. त्यामुळे वादीचा तोंडी व दस्तऐवजी पुरावा कोणत्याही प्रकारे खंडित झालेला नाही.

**११.** भारतीय पुरावा अधिनियम, १८७२ च्या कलम १०८ नुसार, एखादी व्यक्ती ०७ वर्षांहून अधिक काळ बेपत्ता असून ज्या व्यक्तींना तिच्याबाबत स्वाभाविकपणे माहिती असणे अपेक्षित आहे अशा व्यक्तींनाही तिच्याबाबत काहीही माहिती नसल्यास ती व्यक्ती जीवंत असल्याचा अनुमान राहत नाही आणि ती मृत असल्याचा अनुमान निर्माण होतो. या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने एलआयसी ऑफ इंडिया विरुद्ध अनुराधा, (२००४) १० एससीसी १३१ या न्यायनिर्णयात स्पष्ट केले आहे की, ०७ वर्षांहून अधिक काळ बेपत्ता असलेल्या व्यक्तीबाबत न्यायालय मृत्यूचा अनुमान काढू शकते; मात्र मृत्यूची नेमकी तारीख किंवा वेळ याबाबत कोणताही अनुमान काढता येत नाही. मृत्यूची तारीख सिद्ध करण्याची जबाबदारी दावा करणाऱ्या पक्षावरच राहते.

**१२.** त्याचप्रमाणे, विशिष्ठ अनुतोष अधिनियम,१९६३ च्या कलम ३४ प्रमाणे "कोणतीही कायदेशीर ओळख किंवा कोणत्याही मालमत्तेसंबंधीच्या कोणत्याही हक्कासाठी पात्र

असलेली कोणतीही व्यक्ती, अशी ओळख किंवा हक्क नाकारणाऱ्या किंवा नाकारण्यास इच्छुक असलेल्या कोणत्याही व्यक्तीविरुद्ध दावा दाखल करू शकते, आणि न्यायालय आपल्या विवेकबुद्धीनुसार तो व्यक्ती तसा पात्र आहे अशी घोषणा करू शकते, आणि अशा दाव्यात वादीला इतर कोणत्याही अतिरिक्त मदतीची मागणी करण्याची आवश्यकता नाही. परंतु, जेथे वादी केवळ हक्काच्या घोषणेव्यतिरिक्त इतर अतिरिक्त मदत मागण्यास सक्षम असूनही तसे करण्यास टाळाटाळ करतो, तेथे कोणतेही न्यायालय अशी कोणतीही घोषणा करणार नाही."

१३. वर नमूद कायद्याच्या तरतुदीला विचारात घेऊन प्रस्तुत दाव्यात उपरोक्त चर्चेप्रमाणे वादींनी हे यशस्वीपणे सिद्ध केले आहे की, कंचन पोनूस्वामी चेट्टी हा ०७ वर्षांपेक्षा अधिक काळापासून बेपत्ता असून तो जीवंत आहे की त्याचा मृत्यू झाला आहे, याबाबत कोणाला काहीही माहिती नाही. तसेच, तो जीवंत आहे ह्याबाबत कोणीही सांगू शकलेले नाही. त्यामुळे, असे गृहीत धरण्यास हरकत नाही की, कंचन पोनूस्वामी चेट्टी हा जीवंत नाही. अश्याप्रकारे, सर्व वादी हे कंचन पोनूस्वामी चेट्टी हा मयत झाला आहे या घोषणे मिळणेकरिता पात्र आहे. तसेच, वादी यांनी "कंचन पोनूस्वामी चेट्टी हा जीवंत नाही व तो मयत झाला आहे" या घोषणेव्यतिरिक्त इतर अतिरिक्त मदत मागीतलेली नाही. अश्याप्रकारे, त्यामुळे, वादी हे त्यांनी प्रार्थना केल्याप्रमाणे घोषणा करून मिळण्यास पात्र आहे. त्यामुळे, मी मुद्दे क्र.१ व २ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र.३ करिता–</u>**

१४. प्रस्तुत प्रकरणात वादीने हे यशस्वीपणे सिद्ध केले आहे की, कंचन पोनूस्वामी

चेट्टी हे दिनांक १७.११.२०१७ पासून ०७ वर्षांपेक्षा अधिक काळ बेपत्ता आहेत आणि त्यांच्या जीवंत असल्याबाबत कोणालाही कोणतीही माहिती नाही. त्यामुळे भारतीय साक्ष्य अधिनियमातील उपरोक्त तरतुदीनुसार ते मृत असल्याचा कायदेशीर अनुमान निर्माण होतो. तसेच, विशिष्ट अनुतोष अधिनियम, १९६४ च्या कलम ३४ नुसार वादीने त्याच्या कायदेशीर हक्काच्या संरक्षणासाठी घोषणात्मक अनुतोष मागितला असून, सदर दावा ग्राह्य आहे. त्यामुळे वादी हा कंचन पोनूस्वामी चेट्टी हे कायद्याच्या दृष्टीने मृत असल्याची घोषणा मिळविण्यास पात्र आहे. मात्र न्यायालय त्यांच्या मृत्यूची विशिष्ट तारीख घोषित करू शकत नाही. अश्याप्रकारे, वादीने त्याचा दावा सिद्ध केला आहे. म्हणून सदरचा दावा मंजूर होण्यास पात्र आहे. सबब मी मुद्दा क्र.३ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारित करीत आहे:

## <u>आदेश</u>

**१.** वादीचा दावा मंजूर करण्यात येत आहे.

**२.** सदर दाव्यांतर्गत “कंचन पोनूस्वामी चेट्टी हा जीवंत नाही व तो मयत झाला आहे” अशी घोषणा करण्यात येते.

**३.** दोन्ही पक्षांनी आपापला खर्च सोसावा.

**४.** येणेप्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by APARNA ROHIDAS DEORE
Date: 2026.08.03 18:03:12 +0530

(ए. आर. देवरे)

दिनांकः ०३.०८.२०२६

सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर),
ता. भद्रावती, जि. चंद्रपूर.

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी अधिकथन करतो की, या पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द–नि–शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | जी. डी. किटे |
| न्यायालयाचे नाव | : | सह दिवाणी न्यायालय, भद्रावती. |
| न्यायनिर्णयाची तारीख | : | ०३.०८.२०२६ |
| न्यायनिर्णयावर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : | ०३.०८.२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | : | ०३.०८.२०२६ |

...........